**प्रेस नोट** **दिनांक १७/०८/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन

## अल्पवयीन मुलगी दिली ताब्यात

दिनांक १४/०८/२०१९ रोजी चे रात्रगस्तीमध्ये ०२.३० वा. चे सुमारास रात्र गस्तीवरील अधिकारी पो.उप निरी कदम व स्टाफ हे हॉटेल लॉज चेक करीत असताना एक अल्पवयीन मुलगी मिळून आली तिला पोलीस स्टेशन येथे सुरक्षित आणून उपस्थित महिला पोलीसांच्या सहाय्याने अधिक चौकशी करता, सदर अल्पवयीन मुलगी ही सांगली येथील असल्याचे समजले.याबाबत सांगली येथील कुरळ पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गु.र.नं १५९/१९ प्रमाणे दि. १३/०८/१९ रोजी गुन्हा दाखल असून तेथील स्थानिक पोलीस शोध घेत आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने लागलीच पोलीस उप निरीक्षक कदम यांनी सांगली नियंत्रण कक्ष येथून संबंधीत पोलीस स्टेशनचा संपर्क क्रमांक प्राप्त करून संबंधीत दाखल भा.दं.वि. कलम ३६३ चे तपासी अंमलदार यांचेशी संपर्क साधून त्यांना अल्पवयीन मुलगी मिळाले बाबत माहिती दिली त्याप्रमाणे लागलीच संबंधीत पोलीस स्टेशनचे पोलीस स्टाफ हे तात्काळ सांगली येथून निघून वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे येवून सदर अल्पवयीन मुलीस परत घेवून गेले आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे